

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत बोलताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. शेजारी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, डॉ. वाय. एस. पी. थोरात, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. भारती पाटील आदी. (छाया : तय्यब अली)

# छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराची उंची वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत

## डॉ. प्रतापसिंह जाधव; छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीची बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार मोठा आहे. निवड समितीचे काम चांगले सुरू असून पुरस्कारासाठी सुचविलेल्या नावांशी आपण सहमत आहोत. या पुरस्काराची उंची वाढावी यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीची बैठक सोमवारी झाली. याप्रसंगी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. वाय. एस. पी. थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. जाधव म्हणाले, निवड समितीने पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील सुचविलेली नावे ही योग्य आहेत. समितीने योग्य व्यक्ती ठरवून त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कारासाठी निवड समितीने केलेले काम अभिनंदनीय आहे. या पुरस्कारासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असलेल्या व्यक्तीची निवड करावी. पुरस्कारासाठी समिती ठरवेल ते नाव सार्थ असणार आहे. ते राष्ट्रीय एकात्मता व नव्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. वाय. एस. पी. थोरात यांनी समितीचे अध्यक्ष म्हणून पुरस्कारासाठी आलेल्या नावांवर चर्चा केली. ते म्हणाले, समितीने निवडलेली नावे योग्य असून त्या त्या क्षेत्रातील नावलौकिक मिळविलेली आहेत. तरुणांसाठी आदर्श असणाऱ्या व्यक्तीची निवड योग्य ठरेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, निवड समितीने पुरस्कारासाठी ठरविलेली नावे मोठी आहेत. या नावांबरोबरच एखाद्या सेवाभावी संस्थेचा पुरस्कारासाठी विचार व्हावा. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समितीने पुरस्कारासाठी ठरवलेल्या नावांबद्दल आदर आहे. विद्यापीठाचा सन्मान ठरेल आणि समाज व देशात चांगला संदेश जाईल, अशा व्यक्तीची निवड समितीने करावी. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी शोध समितीच्या कामकाजाचे कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू असलेल्या विद्यापीठात ९८.२ टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. कष्ट, प्रामाणिकपणा व ध्येयाने पछाडलेले हे विद्यार्थी आहेत. त्यामुळे पुरस्कारासाठी निवडलेली व्यक्ती त्यांच्यासाठी आदर्शवत राहील, असे नाव निश्चित केले जावे.

याप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य अॅड. धैर्यशील पाटील (सातारा), कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, मानव्यशास्त्र विद्या विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात मल्लिकार्जुन माळगी यांचे उद्या व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील (वाळवा) मराठी विभागप्रमुख प्रा. मल्लिकार्जुन तथा राजा माळगी यांचे व्याख्यान उद्या, बुधवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता प्रा. भारती पाटील असतील.

'१९४२ ची चळवळ आणि क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे कार्य' असा व्याख्यानाचा विषय आहे. विद्यापीठातील इतिहास अधिविभागातर्फे आयोजित क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेतील पुष्प प्रा. माळगी गुंफणार आहेत, अशी माहिती इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी दिली.

# उपेक्षितांच्या समावेशनासाठी धोरणात्मक तरतुदींची आवश्यकता

## उपेंद्र चौधरी; शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून उपेक्षित घटकांचा अभ्यास करून दुर्बल घटकांच्या समावेशनासाठी धोरणात्मक तरतुदींची गरज आहे, असे मत इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेसचे संचालक प्रा. उपेंद्र चौधरी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्यावतीने 'उपेक्षित समूह : विकास आणि उपेक्षितपणा' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी हरियाणा येथील एम. डी. विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. बी. के. नागला होते. त्यांनी दुर्बल घटकांचा विकास आणि उपेक्षितांची समज, आकलन आणि विविध संदर्भ समजून घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन यावेळी केले.

या कार्यक्रमास माजी कुलगुरू प्रा. बी. सी. बरीक (संबलपूर विद्यापीठ, ओरिसा), प्रा. समिता मन्ना (एस. के. बी. विद्यापीठ, पश्चिम बंगाल), प्रा. गुरूस्वामी (तमिळनाडू), अरबिंद अग्रवाल (माजी कुलगुरू, महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठ, बिहार), आर राजेश (म्हैसूर), आदी उपस्थित होते. या केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले.

## विद्यापीठात आज 'तुघलक'चा प्रयोग

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने गिरीश कर्नाडलिखीत 'तुघलक' या नाटकाचा प्रयोग आज, मंगळवारी सायंकाळी सहा वाजता विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहाशेजारील खुल्या रंगमंचावर सादर केला जाणार आहे. हा नाट्यप्रयोग विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित करण्यात आला आहे. या नाट्यप्रयोगात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे २५ विद्यार्थी कलाकार व तंत्रज्ञ सहभागी होणार आहेत.

# ‘बाईची संस्कृती नावाचं भूत मनातून घालवा’

कोल्हापूर टाइम्स टीम

‘मुलींवर सतत पुरूषावर अवलंबून असल्याचा संस्कार केला जातो. यातूनच अनेकदा ती परालंबी मानसिकतेत जाते, यातून बाहेर पडायचे असेल तर बाईची संस्कृती नावाचं भूत मनातुन घालवा’ असे आवाहन संगमनेर येथील निशा शिवूरकर यांनी केले.

शारदाबाई पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने परिघाबाहेरी स्त्रिया या विषयावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन पवार यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. यावेळी कचरावेचक स्त्रिया, वेश्या व थर्ड जेंडर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आले. यावेळी शिवूरकर बोलत होत्या.

अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ भारती पाटील यांनी प्रस्ताविक केले. त्यांनी अध्यासनाची व कार्यशाळेच्या विषयाची ओळख करून दिली. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात निशा शिवूरकर, संगमनेर यांनी परित्यक्ता स्त्रिया या विषयावर विवेचन केले. दुसऱ्या सत्रात मिना शेषू यांनी वेश्या व थर्ड जेंडर या विषयावर मांडणी करताना परिघ म्हणजे काय? जेंडर म्हणजे काय? व थर्ड जेंडर म्हणजे काय? याचे विवेचन केले. त्यानंतर प्रत्यक्ष वेश्या व्यवसाय करणाऱ्या किरण व थर्ड जेंडर रोहित यांनी भूमिका मांडली. त्यानंतरची चर्चा अतिशय मार्मिक होती. दुपारच्या सत्रात पूर्णिमा चिकरमाने यांनी कचरावेचक स्त्रिया व त्यांचे संघटन याविषयी विस्ताराने मांडणी केली. त्यांच्या सोबत प्रत्यक्ष कचरा वेचण्याचे काय करणाऱ्या बायडा गायकवाड व विद्या नाईकनवरे यांनीही अनुभव कथन केले.

सुशिला यादव यांनी घरेलू कामगार स्त्रियांविषयीची मांडणी केली. शेवटच्या सत्रात दिपा शिपूरकर यांनी एड्‌सग्रस्त स्त्रियांसंबधी जे कार्य केले आहे, त्याची चित्रफित दाखविली. कार्यशाळेच्या शेवटी खुली चर्चा झाली. कार्यशाळेसाठी जवळपास २५० कार्यकर्ते प्राध्यापक, विद्यार्थि उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनात किरण शिंदे, कल्याणी सांवत, लता चौगुले यांनी महत्वाचे योगदान दिले.

# विद्यापीठातील जैवविविधता शोधताना...

मालोजी माने
सीसीआर, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग









काही दिवसांपूर्वी शिवाजी विद्यापीठात जैवविविधतेची गणना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, पर्यावरणशास्त्र विभागामार्फत गणनेचे काम करण्यात आले. विद्यापीठाच्या विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी ही मोहीम राबविली.

सजीवसृष्टीने संपन्न अशा शिवाजी विद्यापीठात वनस्पती, पशु, पक्षांच्या अनेक प्रजाती आढळतात. या प्रजाती कोण व कशा प्रकारे शोधतात व त्याच्या नोंदी कोण ठेवते असा प्रश्न तुमच्या मनात नक्की आला असेल.

वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, पर्यावरणशास्त्र या अधिविभागामार्फतच या वनस्पती, पशु, पक्षी, कीटक इत्यादींच्या प्रजाती शोधणे त्यांच्या नोंदी ठेवणे आदी काम केले जाते. कारण वरील अधिविभागांचाच सजीवसृष्टीशी थेट संपर्क येतो.

विद्यापीठात आतापर्यंत सापडलेल्या सर्व प्रजातींचा शोध हा संबंधित अधिविभागतीलच शिक्षक व संशोधक विद्यार्थ्यांनीच घेतला आहे. संशोधक विद्यार्थ्यांना वेळोवेळी त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शन करत असतात. व शोधलेल्या सर्व प्रजातीच्या नोंदी ठेवण्यात त्या त्या अधिविभागाचे मोलाचे योगदान आहे.

एखाद्या नवीन प्रजातीचा शोध लावण्याआधी विद्यार्थांना आधी काही पायाभूत गोष्टींची माहिती असणे आवश्यक असते. आधीपासूनच शोधलेल्या प्रजाती व त्या प्रजातींची वैशिष्ठ्ये. प्रजातींचा अधिवास म्हणजे कोणता जीव कोणत्या प्रकारच्या वातावरणात राहणे पसंत करतो, कोणत्या ऋतुत कोणते जीव आढळतात त्यांचा आहार, त्यांचे रंग, आवाज यांची माहिती असणे आवश्यक असते. वरील गोष्टींचे ज्ञान हे संबंधित पुस्तके वाचून व संबंधित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळेच येते. व मुळात त्या गोष्टीची आवड असणे खूप महत्त्वाचे आहे.

विद्यापीठातील वनस्पतींचा विषय निघाल्यावर एकच नाव डोळ्यासमोर येते ते म्हणजे डॉ. एस. आर. यादव. डॉ. यादव यांनी बऱ्याच वनस्पतींचा शोध लावला आहे व अनेक वनस्पतींचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. शिवाजी विद्यापीठातील प्रसिद्ध लीड बोर्टेनिकल गार्डन उभारण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे.

विद्यापीठातील पशु, पक्ष्यांच्या प्रजाती नोंदी, संवर्धन, प्रबोधन या कामात पर्यावरणशास्त्र व प्राणीशास्त्र विभाग सतत कार्यरत असते. विशेषतः पर्यावरणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, संशोधक विद्यार्थी व एमएससी चे विद्यार्थी खूप कार्यरत असतात. निरनिराळ्या प्रोजेक्ट्समुळे विद्यार्थ्यांची नाळ निसर्गाशी जोडलेली असते. पर्यावरणपूरक विकास कसा साधावा, यासाठी नवनवीन कल्पना त्यांच्या प्रोजेक्टमध्ये दिसतात.

यावर्षीच्या वनस्पती, पशु, पक्षी गणनेत पर्यावरण शास्त्र विभागाचे संशोधक विद्यार्थी अमोल चौगले, एमएस्सी चे विद्यार्थी स्वप्नील असोदे, शुभम कुरुंदवाडकर, भरत व्होवळे, आशीष कोरवी, राहुल गट्टे, वनस्पतिशास्त्र विभागाचे मयूर जाधव, दयानंद जयन्नावर व पत्रकारिता विभागाचे मालोजीराव माने यांच्या टीमने विद्यापीठातील सर्व प्रजातींच्या माहितीचे संकलन केले. लवकरच ते या माहितीची पुस्तिका पर्यावरणशास्त्र विभागाच्या मदतीने प्रकाशित करणार आहेत.

## वनस्पती, पशू, पक्षी मोजण्याच्या पद्धती

पशु, पक्षी मोजण्याच्या साधारणतः तीन पद्धती आहेत. त्या म्हणजे लाइन ट्रांसेक्ट, पॉइंट ट्रांसेक्ट, व्हॉईस ट्रांसेक्ट. लाईन ट्रांसेक्ट म्हणजे एका सरळ रेषेत चालत जाऊन जेवढे आपल्या आजूबाजूला पशु, पक्षी, वनस्पती दिसतील त्यांच्या नोंदी करणे. पॉइंट ट्रांसेक्ट म्हणजे लाइन ट्रांसेक्ट मधून जात असताना मध्येच एखाद्या पॉइंटला थांबून चोहीकडे पाहून पशु, पक्षी, वनस्पतींची नोंद घेणे. आणि व्हॉईस ट्रांसेक्ट म्हणजे आपल्या डोळ्याला पशु, पक्षी दिसत नसले व फक्त त्यांचा आवाज येत असला तर तो आवाज ओळखून त्या प्रजातीची नोंद घेणे.

"

विद्यापीठाच्या साडेआठशे एकरा मध्ये पसरलेल्या परिसरात खूप सारी जैवविविधता आहे. लवकरच अधिविभाग व विभागप्रमुख यांच्या सहकार्याने सर्वांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेतील विद्यापीठातील जीवसृष्टीचे माहिती पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे.

– अमोल चौगले, संशोधक विद्यार्थी, पर्यावरणशास्त्र विभाग

आधीपासूनच पर्यावरणाची आवड असल्यामुळे थोड्याच अवधीत नवनवीन प्रजाती ओळखण्यात मी पारंगत झालोय. मनुष्य व त्याच्या प्रगतीमुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळत चालले आहे. भविष्यात पर्यावरण संवर्धनासाठीचे काम करेन.

– स्वप्नील असोदे, विद्यार्थी पर्यावरणशास्त्र विभाग

वनस्पतिशास्त्र अभ्यासक्रमात वनस्पती कशा ओळखाव्यात, त्यांचे फायदे इत्यादी गोष्टी शिकवल्या जातात. योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळेच मी आज अनेक वनस्पतींची ओळख सांगू शकतो.

– मयूर जाधव, विद्यार्थी, वनस्पतीशास्त्र विभाग

# विद्यापीठाच्या खुल्या रंगमंचावर आज 'तुघलक' नाटकाचा प्रयोग

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने गिरीष कर्नाड लिखित 'तुघलक' या नाटकाचा प्रयोग मंगळवारी (दि. १७) रोजी सायंकाळी सहा वाजता विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहाशेजारील खुल्या रंगमंचावर सादर केला जाणार आहे. विद्यार्थी विकास विभाग व मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा नाट्यप्रयोग आयोजित करण्यात आला आहे. 'तुघलक' हे गिरीष कर्नाड यांचे बहुचर्चित व उत्तम साहित्यिक दर्जा असलेले नाटक आहे. नाट्यप्रयोगात संगीत व नाटयशास्त्र विभागाचे २५ विद्यार्थी कलाकार व तंत्रज्ञ सहभागी होणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी केले आहे.

# कन्याकुमारीहून आलेल्या रिक्षा रनचे विद्यापीठात उत्साही स्वागत

## चार देशांतील ९० व्यक्तींचा सहभाग : दिव्यांग प्रकल्पांना देणार भेटी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कन्याकुमारीहून निघालेल्या रिक्षा रनचे सोमवारी शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उत्साहात स्वागत केले. यात चार देशांतील ९० व्यक्तींचा सहभाग आहे. कर्णावती (अहमदाबाद) येथे रिक्षा रनची सांगता होणार असून देशभरातील विविध दिव्यांग प्रकल्पांना या व्यक्ती भेटी देणार आहेत.

कोल्हापुरातील समदृष्टी, क्षमता विकास आणि अनुसंधान मंडळ (सक्षम) व इतर संस्थांमार्फत देशभर चालणाऱ्या विविध दिव्यांग प्रकल्पांतील कामाची माहिती घेण्यासाठी तसेच दिव्यांग समुदायांबाबत जनजागृती करण्याच्या हेतूने सेवा इंटरनॅशनलमार्फत १० डिसेंबर रोजी कन्याकुमारीहून निघालेली ही रिक्षा रन सोमवारी कोल्हापुरात आली. विद्यापीठातील




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सेवा इंटरनॅशनलच्या रिक्षा रनचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर विविध ३० रिक्षांमधून आलेल्या व्यक्तींचे स्वागत कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले. यावेळी सेवा इंटरनॅशनल यूकेच्या प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन केले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी रिक्षा रनमध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींचे कौतुक केले. शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांचा सन्मान होत असल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरू यांना दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या रिक्षाच्या लाकडी प्रतिकृतीची भेट देण्यात आली. मुंबई सेवा इंटरनॅशनलचे मनिश तांडोल आणि रमेश सुब्रमण्यम यांनी या रिक्षा रनबद्दल माहिती दिली.

यावेळी कुलसचिव विलास नांदवडेकर, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुख डॉ. अंजली निगवेकर, व्यवस्थापन समितीचे सदस्य अमित कुलकर्णी, समदृष्टी, क्षमता विकास आणि अनुसंधान मंडळ (सक्षम) चे अध्यक्ष गिरीश करडे, डॉ. चेतन खारकांडे, सक्षमचे अस्थिव्यंग विभागप्रमुख विवेक मोरे, भक्ती करकरे, डॉ. शुभांगी खारकांडे, सारिका करडे, विनोद पालेशा, अजय मणियार उपस्थित होते.

### चार देशांतील ९० व्यक्तींचा समावेश

कन्याकुमारी येथून सुरू झालेल्या रिक्षा रनमध्ये यूके, ऑस्ट्रेलिया, अमेरिका व केनिया या चार देशांतील १८ ते ७२ वयोगटातील ९० व्यक्ती पाच राज्यांतून स्वत: रिक्षा चालवत २५०० किलो मीटरचा प्रवास पूर्ण करणार आहेत. यामध्ये २६ महिलांचा सहभाग आहे. विशेष म्हणजे प्रवास पूर्ण झाल्यानंतर ३० रिक्षा गरीब व्यक्तींना चरितार्थासाठी चालविण्यासाठी भेट म्हणून देण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2019
सकाळ

# उपेक्षितांच्या समावेशनासाठी धोरण हवे : प्रा. उपेंद्र चौधरी

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर, ता. १६ :** सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून उपेक्षित घटकांचा अभ्यास करून दुर्बल घटकांच्या समावेशनासाठी धोरणात्मक तरतुदींची गरज आहे, असे मत इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेसचे (नवी दिल्ली) संचालक प्रा. उपेंद्र चौधरी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे 'उपेक्षित समूह : विकास आणि उपेक्षितपणा' या विषयावर आयोजित तीनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

एम. डी. विद्यापीठ (हरियाना) येथील निवृत्त प्राध्यापक डॉ. बी. के. नागला अध्यक्षस्थानी होते. त्यांनी दुर्बल घटकांचा विकास आणि उपेक्षितांची समज, आकलन आणि विविध संदर्भ समजून घेण्याची गरज आहे, असे सांगितले. या प्रसंगी केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रमास माजी कुलगुरू प्रा. बी. सी. बरीक (संबलपूर विद्यापीठ, ओरिसा), प्रा. समिता मन्ना (एस. के. बी. विद्यापीठ, पश्चिम बंगाल), प्रा. गुरूस्वामी (तमिळनाडू), प्रा. अरविंद अग्रवाल (माजी कुलगुरू, महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठ, बिहार), प्रा. आर राजेश (म्हैसूर) यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 DEC 2019

Times of India

# Shivaji varsity sheltered 200 people during floods, gave 35L litre of water to KMC

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** During the August floods, the Shivaji University-Kolhapur (SUK) had provided shelter to around 200 stranded citizens and had distributed around 35 lakh litre of clean drinking water to the Kolhapur Municipal Corporation (KMC).

This information was revealed in the senate meeting held earlier last week. Responding to a question by senate member Dhanaji Kanase, the administrative official said the fllod-hit citizens were rehabilitated in the boys' hostel and at Vidyarthi Bhavan on the campus. They were provided with meals on the campus as well.

The health experts from the health centre of the university kept check on the temporary residents. The abundance of grass on the campus also saved the day for the animals in the region, as it was made available to the farmers in the time of distress.

According to the university officials, the university had waived the examination fees for the flood-hit students in Sangli, Satara and Kolhapur districts and had even extended the deadline for the submission of the exam form.

SUK's management council decided to provide relief to students from the flood-affected areas by waiving their semester fees as well. Even the affected colleges will be provided with the aid.

The varsity officials said the affected colleges will be provided with the aid. Notably, the state had received record rainfall in the month of August, when many rivers and water bodies had flooded or crossed the danger levels, necessitating the evacuation of nearly five lakh people in the region. The Maharashtra government then had sought the highest financial aid for Sangli, Kolhapur and Satara districts.

File Photo



The university had also waived the examination fees for flood-hit students from Sangli, Satara and Kolhapur